# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०५.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०४/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७९,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०४/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २०.७९ लिटर दारू असा एकुण ९,०१५/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.०४/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे सेनगाव येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १,४४०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात :—**

दिनांक ०४/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे कलम २७९,३३७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन चालकाने त्याच्या ताब्यातील ऑटो भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन मोसा ला समोरून जोराची धडक दिल्याने यातील फिर्यादी यास जखमी झाला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात येवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

**अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द दिनांक ०४/१२/२०२२ रोजी पोस्टे हटटा येथे ०१ ठिकाणी कलम ३७९ भादवी सह कलम ४८(७)(८) गौण खनीज अधी.प्रमाणे गुन्हा दाखल होवुन आरोपीस ताब्यात घेतले असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.